## रे.दि.मु.नं.४५/२०१८ मधील नि.क.११९ खालील आदेश
## (कृष्णा वगैरे वि. ललिता वगैरे)

वादीने प्रस्तुतचा अर्ज मुद्दे दुरुस्ती होण्याकरिता दाखल केला आहे.

२. वादीच्या म्हणण्यानुसार प्रस्तुतचे प्रकरण निशाणी क्र.९९ व १०२ यानुसार न्यायालयाने जादा मुद्दे नमुद केल्याप्रमाणे वादी यांनी जादा पुरावा देणेवर नेमण्यात आले आहे. निशाणी क्र.९९ नुसार मुद्दा क्र.२अ याबाबत प्रतिवादी यांनी दिलेला अर्ज व मागणीनुसार मुद्दा काढण्यात आला. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ हिने प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचे व तिचे पती यांचे नावे दावा मिळकत व इतर मिळकती बक्षीसपत्राने हस्तांतरण केल्याचे वादी क्र.२ यांचे निदर्शनास आलेप्रमाणे तसे दुरुस्ती अर्ज मंजुर करण्यात आले व त्यानुसार निशाणी क्र.१०२ प्रमाणे मुद्दा क्र.२ब काढण्यात आला.

३. वादीचे पुढील कथन असे की, मुद्दा क्र.२अ शाबीत करण्याची जबाबदारी वादी क्र.१ यांची असल्याने व त्या अनुषंगाने वादीचेच कथन असल्याने त्यामध्ये सदर मुद्दयामध्ये "वादी क्र.१" असे नमुद होणे गरजेचे आहे. तसेच मुद्दा क्र.२ब मध्ये नमुद केल्याप्रमाणे दिनांक ३१.०१.२०१९ रोजीचे बक्षीसपत्र हे दावा मिळकत व इतर मिळकत हस्तांतरण झाल्याने व तसे फेरफार क्र.७७३ व ५१२८ मध्ये नमुद केले असल्याने सदर मुद्दयात "इतर मिळकती वगळता दावा मिळकत" असे नमुद होणे गरजेचे आहे. सबब निशाणी क्र.९९ नुसार मुद्दा क्रमांक २अ मध्ये वादी यांचेपुढे "वादी नंबर १" असे नमुद करण्यात यावे आणि निशाणी क्र.१०२ नुसार मुद्दा क्र.२ब मध्ये "इतर मिळकती वगळता दावा मिळकत" असे नमुद करण्यात यावे व तशी दुरुस्ती व्हावी अशी वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे विनंती केली आहे.

४. प्रतिवादीने सदरच्या अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकुर अमान्य केला आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार न्यायालयाने मुद्दा क्र.२अ प्रमाणे काढलेला वादाचा मुद्दा बरोबर आहे, कारण दाव्यातील त्या बाबतचे कथन दोन्ही

वादींना लागु पडते. तसेच वादी क्र.१ व वादी क्र.२ यांचे वतीने पुराव्याचे प्रतिज्ञापत्र वादी क्र.२ श्री विजय विष्णु धिवार यांनीच दिलेले असुन ते निशाणी क्र.४६ लगत आहे. त्यामुळे सदरील मुद्दा शाबीत करण्याची जबाबदारी ही दोन्ही वादींची आहे. तसेच न्यायालयाने मुद्दा क्र.२ब खाली तयार केलेला वादाचा मुद्दा सुध्दा बरोबर आहे. जरी दाव्यातील मिळकती व्यतिरिक्त इतर मिळकतींचा उल्लेख बक्षीसपत्रात असला तरी, वादीस फक्त सदर दाव्यातील मिळकती संदर्भातच बेकायदेशीर असलेले तबदिल व्यवहार सिध्द करायचे आहेत. म्हणजेच, वादींचा संबंध दावा न्यायप्रविष्ट असताना दावा मिळकतीबाबत केलेले तबदिल व्यवहार हे बेकायदेशीर आहेत या पुरताच मर्यादीत राहणार आहे. दाव्याचे कामकाज पुर्णपणे दोन्ही बाजुंचे पुरावे बंद करुन अंतिम युक्तीवादही पुर्ण झालेला आहे. दाव्याचे कामकाज निकाला पर्यंत पोचलेले असताना दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १४ नियम ५(१) नुसार दाव्याचा निकाल होण्यापुर्वी अतिरिक्त मुद्दे तयार करणे, अनावश्यक मुद्दे वगळणे तसेच वादाच्या मुद्दयात दुरुस्ती करता येण्याची तरतुद आहे. वादीने दाखल केलेला अर्ज पुर्णपणे वेळकाढुपणाचा व कायदेशीर तत्वांना बाधा आणणारा आहे. सबब, तो फेटाळण्यात यावा.

५. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलाकेन केले. त्यावरुन असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरणामध्ये निशाणी क्र.४४ नुसार वाद मुद्दे निश्चीत करण्यात आलेले आहेत. निशाणी क्र.९९ व १०२ या वरील पारीत करण्यात आलेल्या आदेशानुसार, मुद्दा क्र.२अ व २ब नव्याने काढण्यात आले आहेत. तत्पुर्वी, वादी व प्रतिवादी यांनी त्यांचा पुरावा सुरु करुन पुर्वी काढलेल्या वाद मुद्यांच्या अनुषंगाने आपले कथन शाबीतीबाबत कथने केली आहेत. निशाणी क्र.९९ वरील अर्ज बघता, त्यामध्ये वादीने स्वतःच मुद्दा क्र.२अ शाबीत करण्याची जबाबदारी वादींची असल्याबाबत कथन केले आहे. विशेष म्हणजे, प्रस्तुतच्या दाव्यात २ वादी आहेत व त्या दोघांनीही प्रतिज्ञालेखावर दावा दाखल करतेवेळी सहया केल्या आहेत. दोन्ही वादीं तर्फे साक्षीदार श्री विजय विष्णु धिवार म्हणजेच वादी क्र.२ यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.४६ वर दाखल केले असुन त्यामध्ये स्पष्टपणे सदरील पुरावा त्यांच्या

करिता तसेच वादी क्र.१ करिता देत असल्याचे शपथेवर कथन केले आहे. त्याचप्रमाणे, त्या दोघांनीही निशाणी क्र.४ वर दाखल केलेल्या वकीलपत्रानुसार विधीज्ञ श्री आर.आर. सांगलीकर यांची प्रस्तुत दाव्यात त्यांच्या तर्फे कामकाज चालविण्याकरिता नियुक्ती केली आहे. अशा परिस्थीतीत, दावा व त्यात करण्यात आलेली कथने व त्या आधारे काढण्यात आलेले वाद मुद्दे शाबीत करण्याची जबाबदारी ही दोन्ही वादींची असल्याने केवळ ती वादी क्र.१ यांच्यावर सोपविता येणार नाही.

६. वाद मुद्दा क्र.२ब हा निशाणी क्र.१०२ वरील आदेशाच्या अनुषंगाने काढण्यात आला आहे. निशाणी क्र.१०२ वर वादी तर्फे दावा दुरुस्तीचा अर्ज देण्यात आला होता आणि त्या नुसार प्रतिवादी क्र.१ यांनी दावा प्रलंबीत असताना प्रतिवादी क्र.२ ते ४ यांना बक्षीसपत्राद्वारे वाद मिळकत व इतरही मिळकती तबदील केल्या, त्याबाबत दाव्यात दुरुस्ती मागण्यात आली होती. सदरील अर्जावर प्रतिवादींनी आपले म्हणणे सादर केल्यानंतर व दोन्ही पक्षांचे युक्तीवाद ऐकल्यानंतर तो दिनांक २५.०२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये मंजुर करण्यात आला होता. त्यानंतर सदरील दुरुस्तीच्या अनुषंगाने अतिरक्त वाद मुद्दा क्र.२ब निश्चीत करण्यात आला. त्यानुसार वादींवर दिनांक ३१.०१.२०१९ रोजीच्या बक्षीसपत्रान्वये प्रतिवादी क्र.१ हिने प्रतिवादी क्र.२ ते ४ यांच्या लाभात करुन दिलेले बक्षीसपत्र वादींवर बंधनकारक नाही ही बाब शाबीत करण्याची जबाबदारी देण्यात आली. सदरील वाद मुद्दयाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, तो सदरील संपुर्ण बक्षीसपत्राबाबत काढण्यात आलेला आहे. तथापि, वादींच्या म्हणण्यानुसार त्यामध्ये वाद मिळकतीं व्यतिरिक्त इतरही मिळकती समाविष्ठ आहेत. अशा परिस्थीतीत, संपुर्ण बक्षीसपत्र वादींवर बंधनकारक नाही अशी जबाबदारी वादींवर टाकणे संयुक्तीक ठरणारे नाही. त्यामुळे सदरील बक्षीसपत्रात नमुद असलेल्या वाद मिळकतींबाबतच तो मुद्दा पुर्नविलोकीत करणे न्यायाच्या दृष्टीने व दोन्ही पक्षांमधील वाद निराकरणाकरिता न्यायोचीत होईल.

७. उपरोक्त चर्चेच्या अनुषंगाने, प्रस्तुतचा अर्ज हा केवळ वाद मुद्दा क्र.२ब पुर्नविलोकीत करण्याकरिता मंजुर करणे आवश्यक आहे. तथापि, वाद मुद्दा क्र.२अ

शाबीत करण्याची जबाबदारी दोन्ही वादींची संयुक्तीक असल्याने तो पुर्नविलोकीत करण्याची आवश्यकता नाही. परिणामतः सदरीचा अर्ज अंशतः मंजुर करण्यास पात्र ठरतो व त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**१.** अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

**२.** मुद्दा क्र.२ब हा केवळ दावा मिळकतीबाबत या अनुषंगाने पुर्नविलोकीत करण्यात यावा व त्याबाबत निशाणी क्र.४४ वरील वाद मुद्दयांमध्ये दुरुस्ती करण्यात यावी.

**३.** प्रस्तुत अर्जाच्या खर्चाचा विचार दावा अंतिमतः निर्णीत करताना करण्यात येईल.

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.10.16 12:33:46 +0530

ठिकाण - वाई. (आर. एम. भेंडे)
दिनांक - १६.१०.२०२५. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वाई.

**<u>CERTIFICATE</u>**

“ I certify that this Order uploaded is a true and correct copy of original signed Order”.

| | | |
|---|---|---|
| Order dictated on | : | 16.10.2025 |
| Order checked and signed on | : | 16.10.2025 |
| Uploaded by | : | S. C. Redekar<br>Stenographer (Grade-III) |
| Uploaded on | : | 16.10.2025 |